बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | सोमवार,दि.२६ऑगस्ट २०२४ | वर्ष४२ | अंक२५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


## महायुतीमध्ये आमच्यावर अन्याय

मुंबई:पुणे : महायुतीमध्ये आमच्या पक्षावर अन्याय होत आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाला दोन जागा मिळायला हव्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत. त्यामुळे आमच्या पक्षावर अन्याय होत असल्याची, काणाडोळा केला जात असल्याची कार्यकर्त्यांची भावना आहे. आता विधानसभा निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाला बारा जागा मिळाल्या पाहिजेत. तसेच सत्ता मिळाल्यावर मंत्रीपद मिळाले पाहिजे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे (आठवले गट) केंद्रात तिसऱ्यांदा मंत्रिपद मिळाल्याबद्दल आठवले यांचा कार्यकर्त्यांच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिरात नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी आठवले यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

# अन्यथा जातीजनगणना करताना दिसतील

## राजकारण: राहुल गांधींची पंतप्रधान मोदींवर बोचरी टीका!



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सातत्यानं देशात जातीजनगणना करण्याची मागणी करत आहेत. इंडिया आघाडीतील इतर पक्षांनीही या मागणीचं समर्थन केलं आहे. अशात त्यांनी आता एका सर्वेक्षणावरून पुन्हा जातीजनगणनेची मागणी अधोरेखित करत पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य केलं आहे. यावरुन आता पुन्हा देशातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.काही दिवसांपूर्वीच इंडिया टुडे ग्रुपने देशात जातीजनगणेसंदर्भात एक सर्वेक्षण केलं होतं. या सर्वेक्षणात बहुतांश नागरिकांनी देशात जातीजनगणना करण्याची मागणी केली होती. यावरून राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया देत पंतप्रधान मोदी यांच्यावर खोचक शब्दात टीका केली.पंतप्रधान मोदीजी, तुम्ही जर जातीजनगणना थांबवण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही स्वप्न पाहत आहात. आता कोणतीही शक्ती देशातील जातीजणगणना थांबवू शकत नाही. कारण भारतातील जनतेचा आदेश आला आहे, भारतातील ९० टक्के जनता लवकरच जातीजनगणनेला पाठिंबा देतील आणि मागणी करतील. त्यामुळे जनतेच्या या आदेशाची अंमलबजावणी करा, अन्यथा पुढचे पंतप्रधान हे करताना दिसतील, असं ते म्हणाले.

### राहुल गांधींकडून सरकारवर दबाव

महत्त्वाचे म्हणजे राहुल गांधी हे सातत्याने जातीजनगणनेचा मुद्दा उपस्थित करत मोदी सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. काल उत्तर प्रदेशातील एका सभेत बोलतानाही त्यांनी हा मुद्दा उपस्थित करत जाती जनगणनेची मागणी केली होती. जातीनिहाय जनगणनेमुळे केवळ लोकसंख्या किंवा कोणत्या जातीचे किती लोक आहेत एवढंच समजणार नाही, तर कोणाकडे देशाची किती संपत्ती व संसाधने आहेत? कोणत्या क्षेत्रात कोणाची भागिदारी आहे? हेदेखील समजू शकेल. भारतातील ९० टक्के लोक हे देशाच्या सिस्टिमचा भाग नाहीत. मी अलीकडेच मिस इंडिया झालेल्या महिलांची यादी पाहिली. मला वाटत होतं किमान यामध्ये तरी एखादी दलित तरुणी असेल. मात्र, ही यादी पाहून हिरमोड झाला. त्यात ना दलित तरुणी होती, ना आदिवासी, ना ओबीसी. मीडिया, चित्रपटसृष्टी आणि मिस इंडिया बनणाऱ्या तरुणींमध्ये देशातील ९० टक्के लोकांचं प्रतिनिधित्त्व नाही. देशाचं संविधान केवळ त्या उर्वरित १० टक्के लोकांनी नव्हे तर संपूर्ण १०० टक्के लोकांनी बनवलं आहे., असे ते म्हणाले होते.

### भाजपाकडूनही राहुल गांधींना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न

दरम्यान, राहुल गांधीच्या मागणीवरून भाजपानेही त्यांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. जातीजनगणनेचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी देशात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. यांना आता मिस इंडिया स्पर्धा, चित्रपट आणि खेळातही आरक्षण हवं आहे. हा केवळ 'बालबुद्धीचा' मुद्दा नसून त्यांना समर्थन देणारे लोकही तेवढेच जबाबदार आहेत. अशी विधानं मनोरंजनासाठी चांगली आहेत. मात्र, त्यांनी आता देशातील मागावर्गीय जनतेची मस्करी करू नये, असे ते म्हणाले.



# वरपगाव येथे काळवीटाची हत्या!

## कारवाई : वनविभागाने लक्ष देण्याची होतेय मागणी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यात वरपगाव येथे पारधी वस्तीवर काळवीटाची शिकार करून त्याचे मांस व चमड्याची तस्करी करणारे चार आरोपींन वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केज तालुक्यातील वरपगाव येथील शिवारात काळवीट जाळ्यात पकडुन त्याची मान धारदार शस्त्राने कापून शिकार झाल्याची माहिती २४ ऑगस्ट रोजी उडकीस येताच पोलिसांना माहिती मिळताच वरपगांव ता. केज शिवारात पारधी वस्तीवर राहणारे आरोपी बन्सी पवार याचे पत्राचे शेडमध्ये काळविट मारुन त्याचे वाटे करणे चालू आहे. माहीती मिळाल्यावरुन दोन पंचाना पोलीस ठाणे केज येथे बोलावुन घेतले, त्यानंतर केज पोलीस ठाणे अन्वये नोंद करुन बीट अंमलदारसह सरकारी वाहनांने पंचासह मिळालेल्या माहीतीचे ठिकाणी पोलीस प्रशासन गेले असता तेथे एक पत्राचे शेडमध्ये चार ईसम गोलाकार बसुन काळवीटाचे मासांचे वाटे करताना दिसले. त्याचे समोर एक काळवीटाचे दोन शिंगे असलेले मुंडके, ईतर दोन काळवीटाचे शिंगे आम्हास दिसले. लागलीच त्यांना पोलिस प्रशासनाने ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन त्याचे नांव पत्ता विचारले असता त्यांनी त्याचे नांवे भैय्या बन्सी पवार, सुनिल ज्ञानोबा पवार, संजय बन्सी पवार, लाला शहाजी शिंदे सर्व रा. पारधी वस्ती, वरपगाव ता. केज जि.बीड असे सांगीतले. त्यांनतर दोन पंचासह भैय्या बन्सी पवार याचे ताब्यातुन काळवीटाचे कापलेले दोन शिंगे असलेले मुंडके, लाला शहाजी शिंदे याचे ताब्यातून दोन शिंगे काळवीटाचे असलेले, संजय बन्सी पवार याचे ताब्यातुन एक विळा, एक सुरा, एक कत्ती, एक चाकु असे तसेच सुनिल ज्ञानोबा पवार याचे ताब्यातुन अंदाजे २० किलो वजनांचे काळवीटाचे मासांचे व हाडाचे तुकडे दोन तपासकामी पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आले आहे. जप्त करते वेळी आमचे सोबतीला पोलीस सचिन खटके, सपोनि,अमोल मोरे, पोलीस हवालदार हुसेन सय्यद, पोलीस हवालदार प्रदीप वाघमारे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा जिल्हा

# सोयगाव तालुक्यात जबरी चोरी!

## भयभित: घोसला शिवारातील घटना



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गावालगतच्या शेती शिवारातील पत्र्याची शेडचे कुलूप तोडून चार ठिकाणी डल्ला मारून लोखंडी साहित्यासह एक लक्ष ३१ हजार रु किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घोसला शेती शिवारात शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली या प्रकरणी रविवारी सायंकाळी पाच वाजता अज्ञात तीन ते चार चोरट्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

घोसला गावालगत बनोटी रस्त्यावर अनिल भिका बोरसे गट क्र-६८ सुभाष हरने गट क्र-२२४ ज्ञानेश्वर गवळी गट क्र-२२१ यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडच एकाच रात्री कुलुप तोडून अज्ञात चोरट्यांनी एक लाख ३१ हजार रु चे शेती उपयुक्त साहित्य चोरी करून पोबारा केला आहे दरम्यान रविवारी सकाळी सात वाजता सदर शेतकरी शेतात गेले असता हा प्रकार उघडकीस आला याप्रकरणी उपनिरीक्षक रजाक शेख यांनी घटनास्थळी धाव घेवून। दुपारी दोन वाजता

# पाण्यात बुड़न दोन मुलीचा मृत्यु

## दुःखद : शेतात बकरी चारत असताना घडली घटना

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील म्हारोळा येथील गायरान शिवारात बकऱ्या चारत असलेल्या दोन मुली पाण्याच्या डोहात बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी रोजी घडली असून मृत झालेल्या मुलीचे नाव मलिका पेद्रस चव्हाण वय १२ वर्ष व प्राची पेद्रस चव्हाण वय १४ वर्ष रा.म्हारोळा गायरान वस्ती ता.पैठण असे आहे.

अधिक माहिती अशी की बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेले म्हारोळा गायरान शिवारात वस्ती करून राहणाऱ्या मालिका पेद्रस चव्हाण व प्राची पेद्रस चव्हाण या सख्या बहिणी नेहमीप्रमाणे गायरान वस्तीवर जवळ असलेल्या पाण्याच्या डोहाजवळ बकऱ्या चारण्यासाठी गेल्या असता यावेळी पाय घसरून सात ते आठ फूट पाणी असलेल्या डोहात



पडल्यामुळे एकमेकीला वाचवत असतांना दोन्ही मुलीचा मृत्यू झाल्याची घटना अग्रिष टेलर चव्हाण रा. बिडकीन यांनी बिडकीन

पान २ वर...

# बेरोजगारांना मिळाल्या नोकरीच्या संधी!

## सुनील गुट्टे:परळीत पार पडला नोकरी महोत्सव




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

पिनाकी फाउंडेशनचे संचालक सुनिल गुट्टे यांच्या वतिने परळी मतदार संघातील बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून रोजगार नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या नोकरी महोत्सवात तब्बल ९९२ युवक युवतींना नोकरीची थेट अपॉइंटमेंट देऊन नोकरी करण्याची संधी देण्यात आली,असुन बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचा वसा कायम ठेवणार असल्याने यावेळी सुनील गुट्टे यांनी प्रतिपादन केले.सौ. सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पिनाकी फाउंडेशनचे संचालक सुनील गुट्टे यांनी परळी मतदारसंघातील युवक युवतींसाठी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने आज परळी येथे नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या नोकरी महोत्सवात मतदार संघातील जवळपास २७४४ उमेदवारांनी गुगल फॉर्म द्वारे नाव नोंदणी केली होती. या नोकरी महोत्सवात नामांकित ५५ कंपन्यांनी या युवक युवतींच्या मुलाखती घेण्यात आल्या. सहभागी झालेल्या २०१० पैकी ९९२ युवकांना या नोकरी महोत्सवात थेट अपॉइंटमेंट लेटर देऊन त्यांना नोकरी उपलब्ध करून देण्याची संधी देण्यात आली.अहिल्यानगर,छत्रपती संभाजीनगर, पुणे या ठिकाण वरून ५४ कंपन्या उपस्थित होत्या. त्यापैकी टाटा, मिंडा,महिंद्रा, बजाज,क्सिस बँक ,खउखउख बँक, ड्इख बँक, डखउ, जाबिल, ब्रिटानिया, स्विगी ई.या भारतभर नावाजलेल्या कंपन्यांचा या नोकरी मेळाव्यात सहभाग होता.यात मॅनीफॅक्चरिंग,ऑटोमोबाईल,सेक्युरिटी,

बँकिंग,फायनान्स, बीपीओ,के पी ओ,सर्विसेस, सेल्स, इन्शुरन्स इत्यादी. विविध क्षेत्रातील कंपन्यांचा सहभाग होता.पिनाकी फाउंडेशनच्या वतीने पुढाकार घेऊन युवकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम

पान २ वर...

अभिवादन | परळीत केळूसकर गुरुजींची जयंती

# ...म्हणून आंबेडकरांसारखे महामानव घडतात

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

केळूसकर गुरुजी सारखे आदर्श शिक्षक लाभले तर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे महामानव घडतात, असे प्रतिपादन फुले -आंबेडकरी अभ्यासक चेतन निसर्गंध यांनी केले. ते स्टुडन्ट फॉर रिकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी व फुले - आंबेडकरी अभ्यास समूहाच्या वतीने आयोजित दादा केळूसकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्रबोधनपर चर्चासत्राचे चे उद्घाटक म्हणून परळी येथील संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव, परळी औ. विद्युत केंद्रचे सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, ए.तू. कराड, रानबा गायकवाड, नवनाथ दाणे



व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा प्रविण फुटके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दादा केळूसकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी सांगितले की, शिक्षक चांगला असल्यास भावी पिढी घडू शकते, आजच्या शिक्षकांनी आदर्श पिढी घडवावी असे विचार व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना चेतन निसर्गंध म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक व खाजगी आयुष्यात केळूसकर गुरुजी यांनी शेवट पर्यंत साथ दिली. केळूसकर गुरुजी यांनी गौतम बुद्ध, क्षत्रिय कुलावंत छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज यांचे चरित्र मराठीत पहिल्यांदाच लिहिले थॉम्स पेन यांच्या राईट ऑफ मॅन इंग्रजी पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना सयाजीराव गायकवाड महाराजांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून दिली. मात्र ते उपेक्षित राहिले. तर अध्यक्षीय समारोपात प्रा फुटके यांनी आजच्या शिक्षकांनी केळूसकर गुरुजींचा आदर्श घेवून विद्यार्थी घडवावेत. कार्यक्रमाचे

पान २ वर...

# कृषी महोत्सवाचा आज समारोप

## धोरण: कृषिमंत्री धनंजय मुंडे राहणार उपस्थित



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या परळी वैद्यनाथ शहरात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या कृषी महोत्सवाचा सोमवार (दि. २६) रोजी दुपारी एक वाजता समारोप होणार असून राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.कृषी महोत्सवाच्या समारोपप्रसंगी आळंदी देवाची येथील प्रसिद्ध टीव्ही कलाकार व लोकप्रबोधन पर विनोदी भारुड सादरकर्ते गोविंद महाराज गायकवाड यांच्या विनोदी भारुडातून

पान २ वर...

### पाचव्या दिवशीही राज्यातून गर्दी

दरम्यान रविवारी कृषी महोत्सवाच्या पाचव्या दिवशीही राज्यभरातून हजारो शेतकरी बांधव परळीत दाखल झाले असून कृषी महोत्सवास आजही उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन यासह उमेदअंतर्गत उभारण्यात आलेल्या बचत गटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची खरेदी विक्री उलाढाल झाली असून शेतकरी बांधव तसेच विविध कंपन्या आणि महिला बचत गटांना याचा लाभ मिळाला आहे.

## नभाच्या पल्याडचे

उत्सवांचे पडघम वाजू लागले असतानाच्या काळात आणखी एक दिवस मिरवणुका, फटाके अशा कोणत्याही गाजावाजाविना उत्साहाने साजरा करण्याची संधी चालून आली. २३ ऑगस्ट. गेल्या वर्षीचा हाच तो दिवस ज्या दिवशी चंद्राला स्पर्श करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जाणारा तर पहिलाच. विक्रम लँडर चंद्राच्या त्या खडबडीत पृष्ठभागावर अलगद उतरले आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांसह ते दृश्य विविध प्रकारच्या पडद्यांवर 'याचि देही याचि डोळा' पाहणाऱ्या कोट्यवधी भारतीयांनी एकच जल्लोष केला. जगानेही टाळ्या वाजवल्या. कारण, अमेरिका, रशिया आणि चीननंतर असा पराक्रम करणाऱ्या भारताने घेतलेली ही अवकाश झेप अनेकार्थांनी आपली 'ताकद' दाखवून देणारी होती. याला प्रतीकात्मकतेपलीकडेही अनेक आयाम होते. तेव्हा हा राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून घोषित करणे ठीकच. पण चंद्रावर 'विक्रम'चे उतरणे हा जसा अखेरचा टप्पा नव्हे, तसा तो पहिलाही नव्हे, कारण भारताच्या राष्ट्रीय अंतराळ दिवसाला अनेक वर्षांचे सुकृत आहे, हेही ध्यानात असू द्यावे.

भारताचा अवकाश संशोधनाचा प्रवास स्वातंत्र्यानंतर जवळपास दीड दशकात सुरू झाला. डॉ. विक्रम साराभाई यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली अवकाश संशोधनासाठी राष्ट्रीय समिती नेमली गेली. तीच पुढे विकसित होत १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्राोची स्थापना झाली. भारतीय राष्ट्रीय उपग्रह कार्यक्रमाने अवकाश संशोधनाच्या उपयोजनांची मुहूर्तमेढ रोवली. दूरसंचार, दूरचित्रवाणी प्रक्षेपण, हवामान अंदाज, शिक्षण अशा विविध क्षेत्रांसाठी हे गरजेचे होते. यामध्ये केंद्रस्थानी होता तो संशोधनासाठी देशी तंत्रज्ञान विकसित करण्याचा मुद्दा. सुदूर संवेदन, उपग्रह यानांची संरचना अशा काही कळीच्या गोष्टींवर त्यासाठी काम करणे आवश्यक होते. 'इस्राो'च्या स्थापनेआधी थुंबा गावात उभारण्यात आलेले यान प्रक्षेपण स्थानक हा पहिला महत्त्वाचा टप्पा होता. भारताचा अवकाश कार्यक्रम आत्मनिर्भर आणि विकासात मोठे योगदान देणारा असावा, असे विक्रम साराभाईंचे ध्येय होते. 'इस्राो'ने १९७५ मध्ये सोडलेला पहिला उपग्रह आर्यभट्ट ही त्या दिशेने घेतलेली झेप होती. भास्कर, रोहिणी उपग्रह मालिका आणि नंतर इन्सॅट मालिका हे भारतीय अवकाश कार्यक्रमातील निःसंशय मैलाचे दगड. हा सारा प्रवास ऐंशीच्या दशकापर्यंतचा.नव्वदच्या दशकात ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक वाहन अर्थात पीएसएलव्हीचे 'उड्डाण' हे 'इस्राो'चे ध्रुवीय कक्षांमध्ये उपग्रह सोडण्यासाठीचे जणू कार्ययंत्र झाले. पृथ्वीवरील निरीक्षणांपासून सुदूर संवेदनासाठीचे उपग्रह अवकाशात सोडण्यापर्यंतच्या प्रवासात पीएसएलव्हीनेच एक प्रकारे सारथ्य केले. चंद्रयान आणि मंगलयानाची उड्डाणेही पीएसएलव्हीच्याच सारथ्यात झाली. भूसंकालिक उपग्रह प्रक्षेपक वाहन अर्थात जीएसएलव्हीने भूस्थिर कक्षेत उपकरणे सोडण्याची सिद्धता प्राप्त करून आपल्या क्षमता आणखी रुंदावल्या. या प्रवासाची उजळणी एवढ्यासाठी, की अवकाश संशोधनातील कामगिरीचे मूल्यमापन करताना त्यातील पूर्वसूरींचे योगदान विसरले जाऊ नये. अवकाश संशोधनाचे आणि विस्ताराचे सगळे कार्यक्रम राबविताना त्यासाठीची राजकीय इच्छाशक्तीही महत्त्वाचीच. स्वातंत्र्यानंतर भाकरीचा चंद्र शोधण्याची भ्रांत पडलेल्या देशवासीयांना प्राधान्यक्रमांच्या यादीत अवकाशात उपग्रह सोडण्याचा समावेश करणे वेडगळपणाचे वाटलेच असणार. पण, त्याचा उपयोग त्यांचे आयुष्य आणखी सुकर करण्यासाठी होणार आहे, याची जाणीव या लोकशाही देशात रुजविणे खचितच गरजेचे होते. ते काम पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या विज्ञानवादी नेतृत्वाने केले, हे अंतराळ दिनी आठवणेही गरजेचे. कवितेत विरघळलेला चंद्र प्रत्यक्षात तितका मृदू आहे का, हे आज त्याशिवाय आकळले नसते.

चंद्रयान-१ च्या यशानंतर चंद्रयान-२ च्या वेळी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्यात अपयश आले, तरी त्याच्या कक्षेत फिरणारे ऑर्बिटर हे उपकरण चंद्राच्या पृष्ठभागाबद्दल बरीच माहिती देत राहिले. २०१७ मध्ये आपल्या प्रक्षेपक यानाने १०४ उपग्रह एका वेळी अवकाशात नेण्याचा पराक्रमही केला होता. चंद्रयान-३ ने विक्रम लँडर उतरवून चंद्र संशोधनाच्या प्रवासातील पुढच्या स्थानकावरही भारत पोहोचल्याची ग्वाही दिली. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीत अद्याप कायम सदस्य म्हणून स्थान न मिळालेल्या भारताने अवकाश संशोधनात आपले स्थान आपल्या हिमतीवर पक्के केले आहे, हा संदेश चंद्रयान-३ ने नक्कीच दिला. तो जागतिक पातळीवर दृढ करताना केवळ 'अभिमान', 'गर्व है' वगैरेपुरता मर्यादित राहून चालणार नाही. त्याला मुत्सद्दीपणाची जोड द्यावी लागेल. अवकाश संशोधन ही काही विकसित देशांची मक्तेदारी होती. ती मोडताना आपल्याला अधिक पुढे जावे लागेलच, पण अवकाश संशोधनात प्रगत नसलेल्या इतर देशांनाही बरोबर घेऊन त्याद्वारे आंतरराष्ट्रीय संबंधांना नवे परिमाण द्यावे लागेल.तो सामान्यजनांतही जागता ठेवण्यासाठी आपल्या देशाच्या अवकाश संशोधनातील साजरे न करताही मिळविलेल्या यशाच्या पूर्वसुकृताचे स्मरण आवश्यक ठरते. राष्ट्रीय अंतराळ दिनाचा उत्सवी गोंगाट पहिल्या वर्षी तरी फार दिसला नाही हे बरेच; कारण अवकाश-संशोध

# तरुणाईने भरीव योगदान द्यावे

## कार्यक्रम : डॉ. अनिलकुमार गुप्ता यांचे आवाहन

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

'हवामान बदलाचा अनुभव जागतिक पातळीवर सर्वच ठिकाणी स्पष्ट दिसत आहे. महापूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी, दुष्काळ, दरडी कोसळणे, भूस्खलन, हिमनद्यांचे वितळणे...अशा अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना वारंवार करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, देशाचे भवितव्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपत्ती निवारणासह आपत्ती व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करावे. संशोधन, नवकल्पना, डिझाईन आणि उद्योजकीय मानसिकता घडवताना डिझास्टर मॅनेजमेंट क्षेत्रात भरीव योगदान द्यावे', असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे प्रकल्प संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता यांनी केले. 'स्वतःची प्रगती साधताना, सामाजिक दायित्वाचे भान ठेवावे आणि देशाला शाश्वत विकासाच्या दिशेने न्यावे', असेही ते म्हणाले.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या इनोव्हेशन हबच्या २० ते २४ ऑगस्ट दरम्यान कोथरूड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्वामी विवेकानंद सभामंडपात आयोजित पाच दिवसीय राइड इनोव्हेशन कॉन्क्लेव्ह २०२४ च्या समारोप प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रो.डॉ. विश्वनाथ दा. कराड, तसेच डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात एमआयटी डब्ल्यूपीयूच्या स्कूल ऑफ हेल्थ सायन्सेस अँड टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. नीरज महिंद्रू, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, सीएओ, डॉ. संजय कामतेकर व अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. दिनेश सेठ उपस्थित होते. या परिषदेत शेकडो विद्यार्थी, शंभराहून अधिक स्टार्टअप्स आणि भांडवल उदयोगातील पन्नासहून अधिक तज्ञांचा समावेश होता.स्टार्टअप एक्स्पो अवॉर्डचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अमोघ कुलकर्णी यांच्या (द कपडा प्रोजेक्ट) आणि निशांत (आयरिन एआय़) या प्रकल्पांना प्रत्येकी ३० लाख रुपयांचा निधी तसेच गौरी कवी (स्वरधारा प्रोजेक्ट) यांना २० लाख रुपयांचा निधी प्रदान करण्यात आला. डॉ. अनिल गुप्ता म्हणाले, 'देशाचे भवितव्य तरुणाईच्या हाती आहे. हवामान बदलांचे गंभीर परिणाम सर्वत्र दिसू लागले आहेत. त्यातून नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती वाढत आहेत. त्यामुळे मानवी सुरक्षा तसेच जलसाठे, अन्न, हवा यांच्या सुरक्षेचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. शासकीय यंत्रणा, संस्था यांच्या जोडीने देशातील विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरच्या दिशा स्वकेंद्रित न ठेवता, सामाजिक आयामाशी जोडल्या तर देश शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करू शकेल. हवामान बदलाचे परिणाम थेट मानवी सुरक्षेशी, आरोग्याशी तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीच्या स्रोतांशी संबंधित आहेत. स्रोत मर्यादित असल्याने त्यांची सुरक्षा आणि व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर, युवा विद्यार्थ्यांनी आपले संशोधन, नवकल्पना, प्रतिभा, ऊर्जा आणि उद्योजकीय मानसिकतेला काही प्रमाणात सामाजिकतेचे भान जोडणे गरजेचे आहे. मर्यादित स्रोतांतून पायाभूत सुविधांचा विकास करताना लवचिकता असणे महत्त्वाचे आहे. बेसुमार वाढणारी शहरे समस्यांची आगरे झाली आहेत. याचा विचार करून विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरच्या दिशा ठरवाव्यात', असा सल्ला त्यांनी दिला.

डॉ. संजय कामतेकर म्हणाले, 'राईड हा तरुणाईच्या उर्जेचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांनी या माध्यमातून सर्वोत्कृष्टतेकडे वाटचाल करावी आणि राष्ट्रीय विकासाला हातभार लावावा. राईडचा उद्देश संशोधन, नवकल्पना, डिझाईन आणि उद्योजकीय मानसिकता, या संकल्पनांचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्याचा आहे'.डॉ. आर. एम. चिटणीस म्हणाले, 'मानवनिर्मित आपत्तीमुळे देशात आणि जगात अनेक ठिकाणी समस्यांनी उग्र रूप धारण केले आहे. त्यामुळे राईडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रावर संशोधन, नवकल्पना, डिझाईन आणि उद्योगनिर्मितीच्या रूपाने उपाययोजना सुचवण्याची जबाबदारी पेलली पाहिजे. रचनात्मक उपायांचे मार्ग शोधले पाहिजेत. नवकल्पनांची गरज आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात सर्वाधिक भासत आहे. विद्यार्थ्यांच्या रूपाने या क्षेत्रात परिवर्तन घडण्याची आशा आहे'.पिंकी राजपाल म्हणाल्या, 'विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाच्या मानसिकतेतून बाहेर पडून, नव्या करिअरच्या दिशा शोधल्या पाहिजे. पदवीधर होऊन नोकरी मिळवणे, यापेक्षा उद्योजकीय मानसिकता विकसित करून उद्योगांची निर्मिती करण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे. तसेच महिला सक्षमीकरण करण्याची दृष्टी ठेवली तर देश ही सक्षम होईल. वेगळ्या क्षेत्रातील संधींचा विचार करा, एखादे पाऊल चुकले तर निराश होऊ नका, पुन्हा नेटाने प्रयत्न करा, उत्तम मार्गदर्शकांची मदत मिळवा, त्यातून नवकल्पनां द्वारा परिवर्तन घडून येईल'.राजलक्ष्मी राव म्हणाल्या, 'विद्यार्थ्यांनी स्टार्टअप्स, नवे उद्योग सुरू करण्याबरोबरच ग्राहक न्यायालयाच्या प्रक्रियेची, कायद्यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या नव्या संकल्पना आणि वेगळे उद्योग यांच्या उभारणीसोबत कायदेशीर तरतुदी आणि नियमावलींचे आकलन आवश्यक आहे. सर्जनशील विचारातूनच नवकल्पनांचा जन्म होत असतो. त्या कल्पना प्रत्यक्षात आणताना, त्यामध्ये सामाजिक दायित्वाचे भानही जपा, असा सल्ला त्यांनी दिला. डॉ. दिनेश सेठ यांनी आभार मानले. डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

## पान एक वरून

**वरपगाव येथे काळविटाची**

धाराशिव असे होते. तरी वरील आरोपी ,भैय्या बन्सी पवार,सुनिल ज्ञानोबा पवार,संजय बन्सी पवार,लाला शहाजी शिंदे सर्व रा. पारधी वस्ती, बरपगांव ता. केज जि. बीड यांनी काळवीट या वन्यप्राण्यांचे शिकार करून त्यास ठार मारले आहे. व खाण्यासाठी, विक्रीसाठी मासांचे तुकडे केल्याचे मिळुन आले आहे. म्हणून चार आरोपींवर यांचे विरुदध वन्यजिय अधिनियम १९७२ चे कलम ९,३९,५०,५१ सरकारतर्फे फिर्याद आहे.अशा प्रकारे केज पोलीस व धाराशिव पोलिस स्टेशने धडाकेबाज कामगिरी बजावली आहे तरी कृषी मंत्री धनंजय मुंडे साहेब केज तालुक्यात ऐक महीन्यात दोन काळवीटाची शिकार होत आहे तरी तुम्ही झोपला आहेत का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**सोयगाव तालुक्यात जबरी**

पंचनामा केला आहे अनिल भिका बोरसे यांच्या शेड मधून दहा क्विंटल लोखंड खताचा पिशव्या ठिबक चे बंडल दोन वीज पपं आणि फवारणी पपं असा ९१ हजार ९४५ रु चा मुद्देमाल सुभाष हरणे यांच्या शेतातील २५ हजार दोनशे रु चा मुद्देमाल ज्ञानेश्वर गवळी यांच्या शेतातून पीटर मशीन वीज पपं यासह १४ हजार पाचशे रु चा मुद्देमाल असा तिन्ही ठिकाणावरून एकूण एक लाख ३१ हजार रु चा मुद्देमाल घेऊन अज्ञात चोरटे पसार झाले आहे याप्रकरणी शेतकरी अनिल भिका बोरसे यांचेसह तिघांनी दिलेल्या संयुक्त फिर्यादी वरून अज्ञात तीन ते चार चोरट्या विरुद्ध सोयगाव पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रजाक शेख जमदार राजू बर्डे रवींद्र तायडे संदीप सुसर अजय कोळी आदी तपास करत आहे.

मागील महिन्यात घोसला गावात माजी सभापती चंद्रकांत पाटील याच्या घरातील कुटुंबातील सदस्य घरी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्या नी तब्बल ४५ हजार रु रोख व सोन्याची दागिने चोरून लंपास केले होते सतत चया चोरीचा घटनेमुळे घोसलावासीयांचे नाकात दम आला आहे पोलिसांचा तपास शुन्य आहे त्यामुळे सोयगाव हद्दीत चोऱ्या चे सत्र वाढते झाले आहे सोयगाव पोलिसांनी लक्ष घालणं गरजेचे आहे असं ग्रामस्थ म्हणतात.

**बेरोजगारांना मिळाल्या**

करण्याचा आमचा मानस आहे. ज्या उमेदवारांची निवड झालेली आहे. त्यांना नोकरीवर रुजू होईपर्यंत मार्गदर्शन केले जाणार आहे. उमेदवारांची कुठेही गैरसोय होणार नाही, याची आम्ही सर्व काळजी घेणार असल्याचा मानस व्यक्त करत यापुढेही अशाच प्रकारचे नोकरी महोत्सव भरून घेतल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मी घेतलेला वसा कायम ठेवणार असल्याचे श्री.सुनील गुट्टे यांनी सांगितले. दरम्यान या नोकरी महोत्सवात विद्यार्थ्यांच्या त्यांच्या कॅटेगिरी नुसार मुलाखतीसाठी विशेष मुलाखती कक्ष उभारण्यात आले होते. अतिशय शिस्तप्रिय विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात असणाऱ्या कंपन्यांशी कक्षाशी संपर्क साधून मुलाखती दिल्या व कंपन्यांनी पात्र उमेदवारांना थेट अपॉइंटमेंट दिल्याने या युवकांमध्ये आपण काहीतरी करू शकतो.यासाठीचा विश्वास या मुलाखती देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून दिसून येत नाही होता.या नोकरी महोत्सवासाठी युवक युवती व त्यांचा पालक वर्ग अतिशय या कार्यक्रमाचे कौतुक करत या नोकरी महोत्सवात सहभागी झाल्याची दिसून आले.

**कृषी महोत्सवाचा**

समाज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या समारोप समारंभास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी चे कुलगुरू डॉक्टर इंद्रमणी मिश्रा, बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, आत्माचे संचालक अशोक किरनाळी विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर, डॉ.तुकाराम मोटे, ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

म्हणून आंबेडकरांसारखे

सूत्रसंचालन फुले - शाहू आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक भगवान साकसमुद्रे यांनी केले. कार्यक्रमात शरद राठोड, प्रविण जाधव, ए.तू कराड यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास पत्रकार श्रीराम लांडगे, परमेश्वर मुंडे, न प चे महदु मस्के, एसबीआयचे जयपाल कांबळे, महेश मुंडे, हरिभाऊ आगलावे,फुले - आंबेडकरी अभ्यास समूहाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन आकाश देवरे यांनी मानले.

पाण्यात बुडून

पोलीस ठाण्यात येऊन पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांना दिल्यामुळे त्यांनी तात्काळ सपोनि गीते, उपनिरीक्षक महेश घुगे, माने, स.फौ तांगडे, हवालदार कदम, नाडे, चव्हाण, वाघमोडे, वसावे या पोलीस पथकाने घटनास्थळ जाऊन पंचनामा केला मृतदेह बिडकीन येथील शासकीय रुग्णालयात पोस्टमार्टम दाखल केले या घटने संदर्भात बिडकीन पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पुलिस उपनिरीक्षक महेश घुगे हे करीत आहे.

## पान सहा वरून

**यश कंन्ट्रक्शनच्या**

.रस्त्यापर्यंत नालीचे काम केले आहे गल्लीतील येणाऱ्या रस्त्याला नालीचे काम जोडलेले नसल्यामुळे पावसाचे पाणी व सदर नालीचे पाणी रस्त्यावरून येत असल्यामुळे या भागा तील रहिवासी नागरिकांना व या रस्त्या वरून जाणाऱ्या येणाऱ्या ग्रामीण भागातील वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.यश कंसट्रक्शन व सार्वजनिक बांधकाम विभागाशी अनेक वेळा नागरिकांनी तक्रार करून त्यांना भेटून संपर्क साधला तरी देखील ते जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत तसेच यश कंसट्रक्शनच्या आडमुढ्या धोरणामुळे व बांधकाम विभागाच्या निष्काळजी पणामुळे नाहक त्रास होत आहे.सदरचे काम हे आमदार फंडातून आलेले आहे या कामाकडे आमदार नमिता मुंदडा यांचेही देखील लक्ष नाही.लोक प्रतिनिधी हे स्वतःची टक्केवारी घेऊन गप्प बसत आहेत असा आरोप सामाजिक कार्यकर्ते श्री. बाबुराव गालफाडे यांनी केला आहे.पुढे बोलताना गालफाडे म्हणाले की, सदर रस्त्याचे काम करत असताना पाण्याची पाईप लाईन फुटली अथवा ना दुरुस्त झाली तर ती दुरुस्त करण्याची जबाबदारी ही यश कंट्रक्शनची असताना ते टाळाटाळ करत आहेत. त्या अनुषंगाने आम्ही बांधकाम विभागाशी संपर्क केला ते तोंडीच म्हणतात आम्ही सदर कंट्रक्शनला पाईपलाईनचे काम करायला सांगतो परंतु अद्यापही पाईपलाईनचे काम पूर्ण झाले नाही.या यश कंट्रक्शनला नेमके अभय कोणाचे आहे? व त्यांना कोण पाठीशी घालत आहे असाही बाबुराव गालफाडे यांनी सवाल उपस्थित केला आहे.या लेखी निवेदनावर बाबुराव गालफाडे,माजी नगरसेवक लक्ष्मणराव जाधव,सामाजिक कार्यकर्ते शकीलभाई सय्यद, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सौ.शितलताई लांडगे, सौ.हिरकणीताई गायकवाड,संतोष शेलार यांच्या सह २६ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**रस्त्याची झाली चाळण**

आमदार यांनी तर जनाची तर सोडली आहे परंतु मनाची सुध्दा सोडली आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण केज तालुक्यात अनेक भोगस कामाचे उद्धाटन केले परंतु विद्यमान आमदार यांनी दैठना ते राजेगाव रस्त्याकडे डोकाऊन सुध्दा पाहीले नाही आमदार नमीता मुंदडा स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांच्या गावातील लोकांचे मते आमदार होताना घेतली नाही का असा प्रश्न उपस्थित होतो आहे तरी दैठणा ते राजेगाव रस्त्याची दुरावस्था सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष स्थानिक आमदार ग्रामीण भागात लक्ष देतील काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

**मंजूर सोलर पंप चक्क**

दिवस डीपीसाठी आणि नंतर सोलार साठी प्रयत्न करणाऱ्या गोल्हार यांना हा मोठा धक्काच होता. त्यांनी मग माहिती अधिकाराचा वापर करून त्यांच्या ग्राहक क्रमांकाने मंजूर सोलार पंप कोणाला गेलाय याचा शोध घेतला. अगोदर माहिती अधिकारालाही दाद न देणाऱ्या महावितरणने गोल्हार हे अपिलात गेल्यावर मात्र तात्काळ संबंधित शेतकऱ्यांचे नाव आणि त्याचा आणि त्याच्या शेतीचा सर्वे करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे याची माहिती दिली . त्यामुळे गुरुवारी आष्टी येथील महावितरण कार्यालयासमोर अशोक गोल्हार यांनी त्यांच्या ग्राहक क्रमांकाचा वापर करणारा शेतकरी भानुदास कवडे रा शिरापूर आणि त्याला सहकार्य करणारे महावितरण कर्मचारी तसेच सोलार कंपनीचा साईट इंजिनियर यांच्यावर कारवाई व्हावी आणि गोल्हार यांनाच मंजूर असलेला सोलार पंप तात्काळ बसवण्यात यावा यासाठी उपोषण केले . त्यांच्या उपोषणानंतर महावितरण अधिकाऱ्यांना जाग आली. आणि त्या प्रकरणी वीज महावितरणने कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकरी गोल्हार यांनी उपोषण मागे घेतले असल्याचे सांगण्यात आले आहे.

**कष्टाच्या वाटाला संशोधन**

येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र ,शाल -श्रीफळ असे असून कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या कष्टाचा वाटा या बाल कथासंग्रहाला हा सलग सातवा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे

**...तुम्ही निवडणूक**

तुम्हाला निवडून आणून.अशी ग्वाही उपस्थित कार्यकर्त्यांनी यावेळी दिली.दरम्यान साध्या फोन कॉलवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. परंतु या बैठकीला छोट्या सभेचे स्वरूप आले होते.दरम्यान बैठकीत उपसभापती श्रीहरी मोरे यांचे भाषाण खूप प्रभावशील राहिले.बैठक यशस्वी करण्यासाठी नवनाथ धायजे,प्रकाशदादा कोकाटे भीमराव टाकणखार,मुरलीधर साळवे,विठ्ठल पंडित,सचिन जावळे अशोक लांडगे,सचिन डोंगरे, बाळासाहेब पोटभरे,प्रदीप पटेकर, विजय धायजे,दीपक टाकणकार, शेख फिरोज,सदानंद प्रधान,राहुल मस्के,बापू वावळकर,सय्यद फारूक,दत्ता मोरे,रमेश गवळी, अमोल कीर्ते,अतुल चांदमारे,राहुल मोरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी सर्वांच्या वतीने एससी एसटी यांच्या हक्कासाठी येत्या काळात वज्रमूठ आवळण्याचा निर्धार करण्यात आला.

**मनुष्य जीवनास**

सदाशिव भालेराव यांनी केले, सूत्रसंचालन ऍड. दशरथ मकसरे यांनी तर, आभार सचिव जी एन घनगाव यांनी मानले.यावेळी सद् धम्म सेवा संघाचे पांडुरंग जाधव, भगवानराव सातपुते, सोपान उजगरे, रविकांत उघडे, एम.बी चांदमारे, वाल्हाबाई टाकणखार, लीलाताई उजगरे, अरुण नाकलगावकर, धम्मपाल जावळे हे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ नेते कचरू खळगे, संजय बागुल, पद्माकर रुचके, अशोक मगर, बाबा टाकणखार, कॉन्ट्रॅक्टर भास्कर घाडगे, लताबाई बनसोडे, नगरसेविका सुधामतीताई पौळ, बबीताबाई सावंत, वंदनाताई शिनगारे, संघमित्रा अर्बन बँकेचे अध्यक्षा सुनिता घनघाव, मनीषा एकनाथ मस्के आदि तालुक्यातील उपासक उपस्थित होते.

**पात्रुडमध्ये मटका**

नाक्यानाक्यावर बोलले जात आहे. हे धंदे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत पातुड रोड स्टँड शेजारी, एका हॉटेलमध्ये हायवे रोड लगत या ठिकाणी चालु आहेत. या चालणाऱ्या अनधिकृत मटका जुगार, याच्या नादात अनेकांचे कुटुंब उद्धवस्त झाले आहेत. पुरुष दिवस रात्र त्या ठिकाणी आकडे लावण्यासाठी आलेले असतात. काही अशी लोक आहेत की, दिवसभर काम करून दिवसाचे ३००/- रु. घ्यायचे आणि ते तिथेच मटक्याच्या नादात घालवायचे. काहींनीतर आपल्या जवळ असणाऱ्या छोट्या मोठ्या गाड्या देखील या मटक्यापायी विकल्या आहेत याविषयी पोलीस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी नागरिकारातून होत आहे

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जय जिजाऊ अर्बनने हित जोपासले

## रंजित जाधव | तिसऱ्या वर्षात यशस्वी प्रदापण

माजलगाव/पुण्यभुमी प्रतिनिधी

बीड जिल्हा हा उसतोड

मजुरांसाठी ओळखत जाती, मात्र माजलगाव धरणामुळे माजलगाव व परिसरातील शेतकरी समृद्ध झालेला आहे. त्यामुळे शेतीव्यतिरिक्त अन्य रोजगाराच्या संधी आणि साथ विकास हे ध्येय समोर ठेवून व समानाच्या विकासासाठी सहकार आवश्यक आहे. हो गोष्ट लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या मुलांनी एकत्र येत जय जिजाऊ पतसंस्था स्थापना २३ऑगस्ट २०२१ ला केवळ सभासद व १५ लाख रुपये भागभांडवल घेऊन चेअरमन रंजीत जाधव यांनी केली. सुरवातीचे ते वर्षे अनेक संकटांचा सामना करून तालुक्यामध्ये जय जिजाऊ अर्बन पतसंस्था नावारूपाला आली. ३ वर्षीत पदार्पण करत असताना दोन हजार चारशे सभासद संख्या, दीड कोटी रुपयांच्या ठेवी व १ कोटी रुपयांचे कर्ज वाटप असा एकून दीड कोटी रुपयांच्या व्यवसायाचाणा संस्थेने पूर्व केला आहे. याचे संपूर्ण श्रेय सभासद, संचालक, मुख्याधिकारी कर्मचारी यांना जात असल्याचे रंजीत जाधव यांनी सांगितले.

संस्थेने आजपर्यंत आर्थिक काम करत असताना सामाजिक बांधीलकीदेखील जोपासली आहे. आरोग्य शिबीर, वृक्षारोपण, महिता बचत गट शेतकऱ्यांसाठी अल्प कागदापत्रा कर्ज उपलब्ध असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविल्या आहेत. संस्थेच्या असलेल्या सदस्यांपैकी ७० टक्के सभासद है शेतकरी आहेत, तर माजलगाव तालुका हा माजलगाव मागील वर्षाच्या कार्यकाळात संस्थेने खातेदारांसाठी आधुनिक कोअर बेकींग प्रणालीसोबतच आरटीजीएस, नेफ्ट, आपएमएपीएस, मोफत एसएमएस सुविधा, डीडी सुविधा मोबाईल बँकींग क्यूआर कोड, चेक रिंग, अशा अनेक सुविधा गोल्डलोन,शेतकऱ्यांसाठीकर्ज वाहन , पगार तारण,गृहकर्ज आदी कर्ज सुविधा देत आहे. संस्थेने केलेल्या एकूण कर्ज वाटपा पैकी संपूर्ण व नियमित कर्जवसुली मुळेच खातेदारांचा विश्वास संस्थेवा कायम आहे.



**विना सहकार नहीं उद्धार** :विना सहकार नही उद्धार अशी सहकारासंबंधी एक म्हण व्यवहारात रुढ आहे. माजलगावात गेल्या अनेक वर्षापासुन सहकार चळवळीचे बीज रोवले गेले आहे आणि हे बीज अंकुरले असुन या सहकाराचा अनेकांना फायदाच होत आहे. सर्व सामान्य लोकांना बचतीची सवय लावणे आणि गरजेच्या वेळी त्यांना आवश्यक ती आर्थिक मदत कर्ज रुपाने करणे ही महत्वाची कामे सहकारातुन होवु लागल्यामुळे माजलगावातील व्यापारी क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत असे म्हणायला हरकत नाही.



चेअरमन म्हणुनही काम करण्याची संधी मिळाली आहे. हे शक्य होत आहे ते संस्थेच्या सभासदाच्या विश्वासावर पतसंस्थेने गरुड झेप घेतली आहे.पतसंस्थांचे सर्व सभासंद,संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी आधिकारी आणि कर्मचारी मुळेच आहे. ही जाणीव ठेवुन ग्राहकाच्या सेवेत .कार्यरत राहणार आहे.

–चेअरमन रंजीत जाधव जय जिजाऊ अर्बन पतसंस्था लि.माजलगाव

# हिवरा-कोथरुळ रस्त्याची लागली वाट



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जिवनापूर – साळेगाव–पिंप्री ह्या होत असलेल्या रस्ता कामासाठी मुरुम अस्तरीकरण सुरु आहे . परंतु ह्या मुरुम अस्तरीकरणाने नवीन रस्ता चांगला होत असला तरी त्यासाठी ज्या रस्त्यावरुन मुरुमाची होत असलेल्या वाहतूकीने कोथरुळ– हिवरा रस्त्याची पार वाट लावली आहे . सदरील पाच किमीचा रस्ता हायवाच्या वाहतूकीने खचला असुन उखरला आहे ,दबला आहे,मोठी खड्डे पडले आहेत. आता ह्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचत आहे . सदरील रस्ता मुरुमाच्या हायवा वाहतुकीने इतका खराब झाला आहे कि आता यावरुन रहदारी करणे आवघड झाले आहे. रस्ता खराब होत असल्याचे हायवा चालक,मालक यांना माहित असतांना सुद्धा पर्यायी रस्त्याचा वापर केला जात नाही. हा रस्ता खराबीला मुरुम वाहतूक जबाबदार आहे .

### बांधकाम विभागाने लक्ष द्यावे

दररोज होत असलेल्या मुरुमाच्या हायवा वाहतूकीने रस्त्याची खराबी झाली आहे . सदरील रस्ता बीड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येतो . ज्या वाहतूकिने रस्ता खराब झाला आहे त्यांना पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याच्या सुचना द्याव्यात व ह्या रस्त्याचे काम ज्या गुत्तेदाराने केले आहे त्यांना रस्त्याची डागडूजी करण्यास सांगावे. अशी मागणी होत आहे .

# पैशाच्या वादातून कुटुंबीयांना मारहाण

## कारवाई: तिघेजण जखमी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील खरडगव्हाण येथे पैशाच्या वादातून दोघांनी शेतात काम करीत असलेल्या नरवडे कुटुंबाला काठ्याने हल्ला करीत जबर मारहाण केली. त्या दोन महिलांच्या गळ्यातील दागिने तोडून नेले. त्यात तिघे जण जखमी झाले. ही घटना गुरूवारी (दि.२२) दुपारी घडली. याबाबत अंभोरा पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष पोपट वाडेकर, विष्णू सुभाष वाडेकर अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत लंकाबाई प्रल्हाद नरवडे (रा. खरडगव्हाण, ता. आष्टी, जि. बीड) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. आम्ही घराजवळील शेतामध्ये मुगाच्या शेंगा तोडण्याचे काम करीत होतो. यावेळी पती प्रल्हाद नरवडे यांच्या मोबाईलवर संतोष वाडेकर याचा फोन आला. तो म्हणाला, आमचे कांद्याचे पैसे देऊन टाक. त्यावर पती प्रल्हाद नरवडे म्हणाले, आपला पैशाचा व्यवहार मिटला आहे. त्यावर संतोष वाडेकर शिवीगाळ करू लागला. त्यानंतर पती प्रल्हाद नरवडे यांनी फोन ठेवला. दरम्यान, काळी वेळात संतोष वाडेकर व विष्णू वाडेकर आमच्या शेतात आले. तुला हाताखालून काढतो असे म्हणून पती प्रल्हाद नरवडे यांच्यावर काठीने हल्ला केला. सोडविण्यासाठी मधी आलेल्या जाऊबाईला त्यांनी ढकलून दिले. पती प्रल्हाद व मला जबर मारहाण केली. त्यावेळी संतोष वाडेकर याने माझ्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेतले. तर, नंनद पुष्पा जेधे सोडविण्यासाठी मधी आल्या असता त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत विष्णू वाडेकर याने हिसकावली. माझ्या मुलाचा गळा दाबून त्याला मारहाण केली. तर, सासू सोनाबाई यांनाही मारहाण केली. आम्हाला जिवे मारण्याची धमकी देऊन ते निघून गेले. आम्ही सर्वजण घाबरल्याने पोलिस ठाण्यात येऊन फिर्याद दिली. याप्रकरणी रात्री उशिरा अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार मनोज खंडागळे करीत आहे.

# पालकांचे शिक्षण महत्त्वाचे

## डॉ.सविता शेटे:संस्कार विद्यालयात पालक मेळावा





बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज बालकांच्या शिक्षणाबरोबरच पालकांचे समूपदेशन करुन त्यांना बालकांच्या योग्य संगोपनासाठी शिक्षण देणे गरजेचे बनले आहे असे मत बीड येथील महिला महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राचार्या डॉ सविता शेटे यांनी संस्कार प्राथमिक विद्यालयात आयोजित माता पालक संघाच्या मेळाव्यात बाल संगोपन या विषयावर आधारितव्याख्यान प्रसंगी बोलतांना व्यक्त केले

पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की,पालकांनी आपल्या पाल्याच्या वाढीकडे गांभीर्याने लक्ष देऊन सजग बनणे खूप महत्त्वाचे आहे अर्थात आज प्रत्येक बालकांच्यापालकांनी चांगले पालक होणे गरजेचे आहे तसेच आपण रूढी, परंपरा थोडावेळ बाजूला ठेवून महिलांच्या जटिल प्रश्नांवर प्रकाश टाकून ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न व्हायला हवा,शिक्षकांच्या क्षमता वाढविणारे उपक्रम,प्रशिक्षणे घ्यायला हवीत तसेच बालकांच्या विकासामध्ये केवळ शिक्षकच नव्हे तर त्याच्याबरोबर त्या बालकाचे आई–वडील या दोघांचे योगदान खूप महत्वाचे आहे म्हणून आज पालकांनी विवेकी,सजग पालक झाले पाहिजे असे झाले तर पुन्हा बदलापूर ,पुणे,औसा येथील घटनेसारख्या घटना पुन्हा होणार नाहीत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कारप्रबोधिनी बीड संस्थेचेसंचालक दिलीप खिस्ती हे होते त्यांनी अध्यक्षीय समारोपातबोलतांना सांगितले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बालकांचा सर्वांगिण विकास हा केंद्रबिंदू ठेवलेला आहे तेव्हा पालक व शिक्षक यांनी मिळून प्रत्येक बालकांचा सर्वांगिण विकास कसा होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत यावेळी व्यासपीठावर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लीला जाधव, माता पालक समितिच्या सचिव श्रीमती सुनिता रसाळ,मातापालक समितीच्या सदस्या श्रीमती विशाखा ढोले ताई,तिसरी–चौथी चे विभागप्रमुख सुरेश गिरी,आणि पाचवी ते सातवी विभागाचे विभागप्रमुख सुनील सोनवळकर यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती विद्या खवले यांनी केले तर सर्व उपस्थित मातापालक आणि उपस्थित पाहुण्यांचे श्रीमती भाग्यश्री हिवरेकर यांनी आभार व्यक्त केले

# इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करावेत

## रणधुमाळी:आ.संदीप क्षीरसागर यांचे इच्छुकांना आवाहन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी जिल्ह्यातील इच्छूक असलेल्या उमेदवारांनी जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

राज्यभरात सध्या विधानसभेचे बिगूल वाजले आहे. या अनुषंगाने आता राज्यातील इच्छुक उमेदवारांचे अर्ज दि.५ सप्टेंबर २०२४ पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश कार्यालयाकडे पाठवावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातून विधानसभा निवडणुकीत उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्यांना बीड जिल्हा पक्ष कार्यालयाकडून सोमवार (दि.२६ ऑगस्ट २०२४) ते मंगळवार (दि.३ सप्टेंबर २०२४) पर्यंत अर्ज करण्यासाठी सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छिणार्या उमेदवारांसाठी बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे सोमवार (दि.२६) ते मंगळवार (दि.३) पर्यंत दररोज सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

# अत्याचार घटनांच्या निषेधार्थ मोर्चा

## एकजूट: नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात/देशात दररोज बलात्कार, लैंगिक अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. तीन पैकी एक महिला ह्या अत्याचाराने पिडित आहे.बदलापूर, कलकत्ता ,कोल्हापूर, लातूर, माजलगाव या ठिकाणी घडलेल्या चिमुकल्यावंरील अत्याचाराने देश हदरला आहे .मानवतेला काळीमा फासणा–या ह्या घटनांचा जागृत नागरिक म्हणून निषेध करण्या करिता सिरसाळ्यात उद्या दिनांक २६ वार सोमवार रोजी सकाळी १० वाजता ज्यूनिअर पार्डिकर महाविद्यालय पासुन ते गावभर मोर्चा काढत पोलीस स्टेशन पर्यंत जाणार आहे. यात विद्यालयीन, महाविद्यालयीन मुलं, मुली , जेष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते,सामाजिक महिला कार्यकर्त्या, डॉक्टर आसोशियन, शिक्षक, प्राध्यापक मोठ्या संख्याने उपस्थित राहणार आहेत.या बाबत चे निवेदन सिरसाळा पोलीस स्टेशन येथे सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांना देण्यात आले आहे. निवेदन देता वेळी उत्तम दादा माने,प्रा. उषा माने ,डॉ. नावंदर डॉ.तौर, डॉ.सोनवणे, डॉ.पवार, पत्रकार मिलिंद चोपडे,डॉ. पवार मॅडम, डॉ आचार्य , मदन वाघमारे ,डॉ.नागरगोजे,कदम,जाधव आदीसह अनेकजण उपस्थित होते .

# शेतकऱ्यांना ई केवायसीचे आवाहन

## योजना: प्रोत्साहनपर अनुदानासाठी धावपळ

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रोत्साहन पर अनुदानासाठी प्राप्त असलेल्या दोन हजार ९० शेतकऱ्यांपैकी दोन हजार ४१ शेतकऱ्यांना सात कोटी ७७ लाख रु चा निधी वितरित केल्या नंतर तब्बल तीन वर्षे ब्रेक घेतलेल्या या योजनेसाठी सोयगाव तालुक्यात पुन्हा निधी प्राप्त झाला आहे त्यासाठी वंचित पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्याची ई केवायसी राहिली आहे या प्रलंबित शेतकऱ्यांनी (ता ७) सप्टेंबर पर्यंत ई केवायसी करण्याचे आवाहन सहायक निबंधक संजय गाजुलवाड यांनी केले आहे

सोयगाव तालुक्यात दोन हजार ४१ शेतकऱ्यांच्या खात्यावर महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजने अंतर्गत प्रोत्साहन पर लाभाची तीन वर्षांपूर्वी सात कोटी ७७ लक्ष इतकी रक्कम खात्यात वर्ग केली होती मात्र निधी अभावी या योजनेला शासनाने ब्रेक दिला होता मात्र निधीची रक्कम प्राप्त झाली असून त्यासाठी लाभापासून वंचीत राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना आता( ता ७) सप्टेंबर पर्यंत ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यातील योजनेसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने ई केवाय सी करण्यात यावे असे सहायक निबंधक संजय गाजुलवाड यांनी सांगितले आहे

## डॉ.योगेश क्षीरसागर | बीडमध्ये महिलांचा सन्मान

# योजना पोहचविण्यात मोलाचे योगदान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आरोग्य, महिला बालविकास, ग्रामविकास अशा अनेक विभागांच्या योजनांची तंतोतंत अंमलबजावणी आणि ग्रामीण भागात तळागाळापर्यंत नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविण्याचं काम आशा सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांच्या माध्यमातून होत आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून त्यांचं मोलाचं योगदान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीड येथील कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी (दि.२५) अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या होत्या. व्यासपीठावर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती आघाडी जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, महिला आघडीच्या जिल्हा उपाध्यक्ष शालिनी परदेशी, बीड तालुकाध्यक्ष संगीता वाघमारे, कल्पना बांगर, ललिता अडाणी, माया वाघमारे, बांगर कोल्हे, सुनंदा कोल्हे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होत्या.पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, आशा सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे योगदान समाज विसरू शकत नाही. वार्ड, गाव पातळीवर त्यांच्याशिवाय काम पूर्णत्वास जाऊ शकत नाही. त्यांच्यामुळे माझी लाडकी बहिण योजना गतीने राबविली जात आहे. त्यांचे वेतन वाढ करण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, आशा सेविका, मदतनीस यांचे वेतन वाढविण्याबाबत नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात महिला व बालविकास मंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी ग्वाही दिलेली आहे. आपल्या प्रशासकीय, स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असे डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी म्हटले. यावेळी अनेक महिलांनी मनोगत व्यक्त करून डॉ.योगेश क्षीरसागर यांना पाठबळ देण्याची ग्वाही दिली. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्या, महिलांची मोठ्या संख्येने प्रचंड गर्दी होती.




**योगेश क्षीरसागरांना बांधल्या राख्या**

आशा सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांच्यशा शेकडो महिला, बहिणींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना राख्या बांधल्या. याच कार्यक्रमात त्यांनी सहाशेहून अधिक महिलांना साडी भेट देऊन सन्मान केला. या कार्यक्रमात महिलांची गर्दी लक्षणीय होती.

# सोयगाव तालुक्यात तीनच धरणे शंभर टक्के!

## आस्मानी: धिंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात तीन दिवस रिपरिप आणि कमी अधिक जोर धरून झालेल्या पावसाने सोयगाव तालुक्यातील अकरा प्रमुख धरणांपैकी सोयगाव(वेताळवाडी) जरंडी(धिंगापूर) आणि देव्हारी ही तिन्ही धरणे शंभर टक्के भरली असून रविवारी धिंगा पूर धरणातून सांडव्या द्वारे सुकी नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे त्यामुळे सुकी नदी दुथडी भरून वाहत आहे

सोयगाव सह तालुक्यात तीन दिवसांपासून सतत रिपरिप व कमी अधिक जोरात पाऊस सुरू होता रविवारी या पावसाने उसंत घेतली आहे मात्र तालुक्यातील प्रमुख अकरा धरणांपैकी केवळ सोयगाव वेताळवाडी देव्हारी व धिंगापूर ही तीन धरणे शंभर टक्के भरली आहे जरंडीच्या धिंगापूर धरण ओव्हर फ्लो झाल्याने या धरणातून सांडव्या द्वारे पाण्याचा रविवारी अकरा वाजता विसर्ग करण्याचा निर्णय पाट बंधारे विभागाने घेतला होता दरम्यान बनोटी धरणांत ७६ टक्के पाण्याचा साठा आला असून वरठाण तीन टक्के हनुमंत खेडा एक टक्के व गोंदेगाव बिलोसिल आहे त्यामुळे या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार असल्याचे चित्र आहे आगामी आठवड्यात बैलपोळा सण आहे त्यामुळे या भागात ऐन पोळा सणाच्या तोंडावर पाणी टंचाई चे संकट कोसळले आहे सोयगाव तालुक्यातील ११८ पाझर तलाव आहे त्यापैकी केवळ १८ पाझर तलावात पाणी साठा उपलब्ध असून शंभर पाझर तलाव कोरडेठाक आहे

# पंतप्रधान मोदींच्या मिठीवर पाश्चात्य प्रसारमाध्यमांकडून टीका!

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी युक्रेन दौऱ्यावर आहेत. येथे पोहोचल्यावर पंतप्रधानांचे जंगी स्वागत करण्यात आले. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांना मिठी मारून पंतप्रधान मोदींनी आपले सौहार्दपूर्ण संबंध दाखवले. मात्र, रशिया दौऱ्यावर असताना पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष पुतीन यांची गळाभेट घेतल्यावर पाश्चात्य माध्यमांनी केलेल्या टीकेला परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की भारतीय संस्कृती लोकांमधील नातेसंबंध आत्मसात करण्यावर भरभराट करते जे पाश्चात्य संस्कृतीच्या बाबतीत असू शकत नाही.



पत्रकार परिषदेत पाश्चिमात्य माध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले की, आमच्या भागात लोक भेटतात तेव्हा ते एकमेकांना मिठी मारतात. तो आपल्या संस्कृतीचा भाग नसू शकतो, तो आपल्या संस्कृतीचा भाग आहे. ते म्हणाले की आमच्यात सांस्कृतिक फरक आहे जो कदाचित पश्चिमेकडील लोकांना समजत नाही. आज झेलेन्स्की यांनीही पंतप्रधान मोदींना मिठी मारली. जयशंकर म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि झेलेन्स्की यांच्यातील बहुतांश चर्चा रशिया-युक्रेन संघर्षाबाबत होती.

# अंतराळातील वाढत्या कचऱ्यावर राष्ट्रपतींकडून चिंता

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी अंतराळात अनेक उपग्रहांमुळे वाढत्या काचऱ्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने २०३० पर्यंत भविष्यातील अंतराळ मोहिमा कचरामुक्त करण्याचे लक्ष्य निश्चित केल्याबद्दल कौतुक केले.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर भारताच्या चांद्रयान-३ च्या लॅण्डिंगच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित प्रथम राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बोलत होत्या.

अंतराळातील उपग्रहांच्या काचऱ्यामुळे अंतराळ मोहिमांसाठी समस्या निर्माण होऊ शकतात, असे राष्ट्रपतींनी येथील भारत मंडपम् येथे आयोजित कार्यक्रमात

**पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन**



सांगितले. या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह, इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ, संस्थेचे अभियंते, शास्त्रज्ञ आणि देशातील अंतराळ उद्योगाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. राष्ट्रपतींनी इस्रोच्या सुरक्षित आणि शाश्वत ऑपरेशन्स मॅनेजमेंट सुविधेचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, भारत २०३० पर्यंत आपल्या सर्व अंतराळ मोहिमा कचरामुक्त करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, हे जाणून मला आनंद झाला. यावेळी राष्ट्रपतींनी रोबोटिक्स चॅलेंज आणि इंडियन स्पेस हॅकाथॉनच्या विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले. इस्रोने अंतराळ क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून, देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासातही अमूल्य योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले. कमीत कमी संसाधनांचा उपयोग करून भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला जगात सर्वोत्तम स्थान प्राप्त करून दिल्याबद्दल राष्ट्रपतींनी समर्पित शास्त्रज्ञांचे कौतुक केले. मर्यादित संसाधनांसह यशस्वीरित्या पूर्ण केलेली मंगळ मोहीम असो किंवा एकाच वेळी शंभराहून अधिक उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण असो, यात आम्ही उत्तम यश संपादन केले आहे.



## अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार प्रकरण

# आसाममध्ये जोरदार निदर्शने

वृत्तसंस्था

**गुवाहाटी :** महाराष्ट्रासह, आसाम, पंजाब, कोलकत्ता राज्यात महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या घडना हृदय हेलावून टाकणाऱ्या आहेत. देशात महिला तरुणी, मुली सुरक्षित नसल्याचे या घटनांवरून दिसून येत आहे. आसामच्या नागाव जिल्ह्यात १४ वर्षीय मुलीवर तीन जणांनी केलेल्या कथित अत्याचाराच्या विरोधात आसाम राज्यात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा यांनी सांगितले.

पोलिसांनी सांगितले की, गुरुवारी रात्री आठच्या सुमारास धिंग परिसरात दहावीत शिकणारी विद्यार्थिनी शिकवणी संपवून सायकलवरून घरी परतत असताना मोटारसायकलवरून आलेल्या तिघांनी हल्ला करत तिच्यावर बलात्कार केला. बलात्कारानंतर तिला जखमी आणि बेशुद्धावस्थेत एका तलावाजवळ रस्त्याच्या कडेला सोडून दिले. स्थानिकांनी तिला पाहिले आणि पोलिसांना माहिती दिली. महाराष्ट्रात बदलापूरमधील शाळेत दोन चिमुरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र, मुंबई हायकोर्टाने या बंदला परवानगी नाकारली. यानंतर महाविकास आघाडीकडून पुकारलेला महाराष्ट्र बंद मागे घेण्यात आला. तर आज महाविकास आघाडीकडून ठिकठिकाणी निषेध आंदोलन करण्यात येत आहे. ठाकरे गटाकडून दादरच्या शिवसेना भवन परिसरात निषेध आंदोलन करण्यात आले. त्यादरम्यान बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले 'अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे, पण त्याहीपेक्षा त्यांच्या पापावर पांघरूण घालणाऱ्यांनाही शिक्षा झालीच पाहिजे.

## गुन्हेगारांवर कडक कारवाई करू : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा यांनी हैलाकांडी येथे पत्रकारांना सांगितले की, धिंग येथील अल्पवयीन हिंदू मुलीबरोबर असा जघन्य गुन्हा करण्याचे धाडस करणाऱ्या गुन्हेगारांना कायदा सोडणार नाही. सर्मा यांनी आरोप केला की, 'लोकसभा निवडणुकीनंतर एका विशिष्ट समुदायातील सदस्यांचा एक भाग खूप सक्रिय झाला आहे आणि त्यांना अशा प्रकारचा गुन्हा करण्यास उसकवले जात आहे. मात्र, आम्ही गुन्हेगारांवर कडक कारवाई करू आणि कुणालाही सोडले जाणार नाही. दरम्यान, गुन्हेगारांना अटक करण्याची मागणी करत समाजातील विविध स्तरातील लोक शुक्रवारी सकाळी रस्त्यावर उतरले. दुकानदारांनी त्यांचे व्यवसाय बंद ठेवत सामाजिक आणि राजकीय संघटनांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची आणि महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेची मागणी केली.

# ॲपआधारित टॅक्सी सेवा ही काळाची गरज : टीटीएजी

## विरोध केल्यास पर्यटन व्यवसायावर परिणाम

**पणजी :** ॲप आधारित टॅक्सी सेवा ही काळाची गरज आहे. या सेवेचा केवळ पर्यटकांना नव्हे तर स्थानिकांनादेखील फायदा होत आहे. टॅक्सी चालकांच्या काही समस्या असतील तर त्यांनी सरकारसोबत बोलणी करून त्या सोडवाव्यात. ॲप आधारित टॅक्सीला विरोध केल्यास राज्यातील पर्यटन व्यवसायावर परिणाम होऊ शकतो असे मत गोवा ट्रॅव्हल अँड टुरिझम असोसिएनच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. शुक्रवारी पणजीत झालेल्या पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष जॅक सुखिजा म्हणाले की, राज्यातील



पर्यटन क्षेत्रात चांगला रोजगार आहे. यामुळे सरकारला दोन हजार कोटींचा महसूल मिळतो. हा व्यवसाय सांभाळून ठेवण्यासाठी पर्यटक किंवा ग्राहकाला काय हवे आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. जगभरात आणि देशातही ॲप आधारित वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, गोव्यात असे पर्याय उपलब्ध नाहीत. ते म्हणाले, राज्यातील टॅक्सी ॲपचा प्रश्न गेली अनेक वर्ष प्रलंबित आहे.

# 'भारत कोणाच्या पाठीत खंजीर खुपसू शकत नाही'

## राजनाथसिंह यांचे प्रतिपादन

वृत्तसंस्था...

**वॉशिंग्टन :** लबाडी, कपट आपल्या स्वभावात नाही. आपण फसवले जाऊ शकतो, मात्र कोणाला फसवणार नाही हा संदेश जगाला गेला पाहिजे असे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी म्हटले आहे. चार दिवसांच्या अमेरिका भेटीवर आलेल्या राजनाथसिंह यांनी अनिवासी भारतीयांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली. अमेरिकेचे संरक्षणमंत्री लॉईड ऑस्टिन यांच्याशी चर्चेसाठी अमेरिका



भेटीवर आलेल्या राजनाथ यांनी भारतीयांशी बोलताना वसुधैव कुटुम्बकम्‌चा संदेश दिला. भारतीयांनी अत्यंत प्रामाणिकपणे काम करावे. तुम्ही भारताप्रति समर्पित राहिले पाहिजे, मात्र तुम्ही येथे अमेरिकेत काम करत असल्यामुळे या देशाप्रती तुमच्या समर्पणाबाबतही प्रश्न उपस्थित व्हायला नकोत.

# रेवण्णा पिता-पुत्रांच्या अडचणीत वाढ; एसआयटीकडून आरोपपत्र दाखल

देशोन्नती वृत्तसंकलन

**बेंगळुरू :** जेडीएसचे माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्याविरुद्ध अत्याचार आणि त्यांचे वडील आणि आमदार एचडी रेवण्णा यांच्याविरुद्ध लैंगिक छळ केल्याप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाने आरोपपत्र दाखल केले आहे. वेगवेगळ्या प्रकरणात आणखीही काही आरोपपत्रे दाखल केले जाण्याची शक्यता आहे.

प्रज्वलच्या प्रकरणात एसआयटीने दोन हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले असून सुमारे १५० साक्षीदारांच्या जबाबांचा त्यात समावेश आहे. प्रज्वल



रेवण्णाने अक्षरशः शेकडो महिलांवर अत्याचार केल्याचा आरोप असून त्याचे तीन हजार व्हिडिओही उपलब्ध आहेत. लोकप्रतिनिधींच्या विशेष न्यायालयात सादर केलेले आरोपपत्र, कुटुंबातील एका घरगुती नोकरावर कथित लैंगिक अत्याचाराच्या एका प्रकरणाशी संबंधित आहे. या प्रकरणाच्या स्पॉट इन्स्पेक्शन मध्ये जैविक, भौतिक, वैज्ञानिक, मोबाईल, डिजिटल आणि इतर संबंधित पुरावे गोळा करण्यात आले आहेत. आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी तज्ज्ञांचे मत घेण्यात आले, असे एसआयटीने म्हटले आहे. प्रज्वल रेवण्णा हा माजी पंतप्रधान देवेगौडा यांचा नातू असून त्यांचा आमदार असलेला मुलगाही यात आरोपी आहे. वडील-मुलांच्या विरोधात पहिली तक्रार त्यांच्या राहत्या घरी काम करणाऱ्या महिलेच्या तक्रारीवरून नोंदवण्यात आली आहे. आमदाराची पत्नी भवानी हिची नातेवाईक असलेल्या पीडितेने आरोप केला आहे की, तिचा अनेकदा लैंगिक छळ करण्यात आला.

# भारतीय लष्कराचे ड्रोन पीओकेत पडले

**नवी दिल्ली:** भारतीय लष्कराचे एक यूएव्ही ड्रोन तांत्रिक बिघाड झाल्याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये जाऊन पडले. पाकिस्तानी लष्कराने ते ताब्यात घेतले. त्यानंतर भारतीय लष्कराने हॉट लाइनवर पाकिस्तानी लष्कराला संदेश पाठवून ड्रोन परत करण्यास सांगितले. शुक्रवारी (दि. २३) सकाळी ९.२५ वाजता भारतीय हद्दीत असलेल्या मिनी यूएव्हीमध्ये तांत्रिक बिघाड झाला. ते जम्मू-काश्मीरच्या राजौरी सेक्टरमधील बिम्बर गली भागाच्या समोरील पीओकेच्या नाकियाल सेक्टरमध्ये जाऊन पडले, असे भारतीय लष्कराच्या सूत्रांनी सांगितले.

# ब्रिटनचे अब्जाधीश माइक लिंच यांचा मृतदेह हस्तगत

**सिसली :** ब्रिटनचे दिग्गज अब्जाधीश माइक लिंच यांचा मृतदेह याटच्या अवशेषांमधून गुरुवारी प्राप्त झाला आहे. हे याट इटलीच्या सिसली किनाऱ्यावर सोमवारी आलेल्या वादळात बुडाले होते. माइक लिंच यांची कन्या हन्नाह अद्याप बेपत्ता असल्याचे इटलीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ५६ मीटर लांब याद द बेयसियन पोर्टिसेलोनजीक उभी असताना अचानक वादळ आल्याचे सांगण्यात आले.

माइक लिंच यांना ब्रिटनचे बिल गेट्स असे संबोधिले जात होते. लिंच यांची अलीकडेच अमेरिकेतील एका खटल्यातून निर्दोष मुक्तता झाली होती. संबंधित याटमध्ये १० जणांचा

### मुलीचा अद्याप लागला नाही शोध

चालक दल आणि १२ प्रवासी होते. दुर्घटनेनंतर लिंच यांची पत्नी एंजेला बकारेस आणि अन्य १४ जणांना वाचविण्यात आले होते. आतापर्यंत ६ जणांचे मृतदेह हस्तगत झाले आहेत. लिंच यांच्या मुलीला शोधण्यास काही वेळ लागू शकतो. कारण दुर्घटनेवेळी याट अत्यंत खोल समुद्रात उभी होती. या दुर्घटनेसंबंधी न्यायालयीन चौकशी केली जाणार आहे. या चौकशीचे नेतृत्व एम्ब्रोगियो कार्टोसिया करणार असून लवकरच ते पत्रकार परिषदेद्वारे माहिती देतील असे अग्निशमन विभागाचे प्रवक्ते लुका कैरी यांनी सांगितले आहे.

# यूएईने दिली तालिबानच्या राजदूताला मंजुरी

वृत्तसंस्था

**काबूल:** अफगाणिस्तानातील तालिबानी राजवटीला मोठे कूटनीतिक यश मिळाले आहे. आखातातील प्रभावशाली मुस्लीम देश संयुक्त अरब अमिरातने नव्या तालिबानी राजदूताचे परिचय पत्र स्वीकारले आहे. चीननंतर यूएईने तालिबानकडून नियुक्त करण्यात आलेल्या राजदूताचे परिचयपत्र स्वीकारले आहे. जगातील अद्याप कुठल्याही देशाने तालिबानी राजवटीला



मान्यता दिलेली नसताना यूएईने हे पाऊल उचलले आहे. तालिबानने आता पाकिस्तानला बाजूला करत स्वतःच सर्व देशांसोबत संपर्क साधण्याचे धोरण अवलंबिले आहे. तर यूएईचा निर्णय पाकिस्तानसाठी मोठा झटका असल्याचे मानले जात आहे.

# भारत-अमेरिकेदरम्यान मोठा संरक्षण करार

## पुरवठा सुरक्षा करारावर स्वाक्षरी

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि भारताने पुरवठा सुरक्षा व्यवस्था (सिक्युरिटी ऑफ सप्लाय अरेंजमेंट) करारावर स्वाक्षरी केली आहे. हा करार अमेरिकेचा संरक्षण विभाग आणि भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयादरम्यान संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान २२ ऑगस्ट रोजी झाला आहे. हा करार द्विपक्षीय संरक्षण संबंधांना चालना देत दोन्ही देशांना राष्ट्रीय सुरक्षा आवश्यकता पूर्ण करण्यासाठी परस्परांकडून आवश्यक औद्योगिक साधनसामग्री प्राप्त करण्यास सक्षम करणार आहे.

या करारामुळे अमेरिका आणि भारत राष्ट्रीय सुरक्षेला प्रोत्साहन देणाऱ्या सामग्री तसेच सेवांसाठी परस्परांना सहाय्य प्रदान करण्यावर सहमत झाले आहेत. हा करार संकटकाळासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे, कारण त्या काळात कुठल्याही देशाच्या तात्काळ गरजा असतात. हा करार आता दीर्घकालीन पुरवठा साखळी स्थैर्याला चालना देणार असल्याचे अमेरिकेच्या संरक्षण विभागाने म्हटले आहे. वॉशिंग्टन डीसीमध्ये दोन महत्त्वपूर्ण दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्यात आली आहे. पुरवठा सुरक्षा व्यवस्थेद्वारे (एसओएसए) अमेरिका आणि भारत राष्ट्रीय सुरक्षेला बळ देणाऱ्या सामग्री आणि सेवांसाठी पारस्परिक प्राथमिकता समर्थन देण्यासाठी सहमत झाले आहेत असे उद्गार संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी एक पोस्ट करत काढले आहेत.



**पुणे:** बदलापूरसह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी घडलेल्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांचा व असंवेदनशील सरकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने पुण्यात आंदोलन केले. या आंदोलनात राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार काळया रंगाच्या पट्ट्या बांधून व कार्यकर्त्यांसह धरणे धरून बसले होते. त्यांच्यासोबत सुप्रिया सुळेही उपस्थित होत्या.

# विदेशी महिलेवर लैंगिक अत्याचार करणारा निर्दोष मुक्त

**पणजी :** बार्देश तालुक्यातील एका समुद्रकिनाऱ्यावर २०२० मध्ये मसाज देण्याच्या बहाण्याने विदेशी महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आले होते. या प्रकरणातील पीडित महिलेचे निधन झाले. या प्रकरणातील साक्षीदारांनी जबाब फिरविल्यामुळे आणि वैद्यकीय पुरावे नसल्यामुळे न्यायालयाने सोमप्पा राठोड (बागलकोट-कर्नाटक) याची पुराव्याअभावी न्यायालयाने निर्दोष सुटका केली आहे. याबाबतचा निवाडा पणजी येथील जलदगती व पोक्सो न्यायालयाच्या न्या. दुर्गा मडकईकर यांनी दिला.

# तुटलेल्या धरणाची पाहणी करणारा अभियंता गेला वाहून

## एसडीआरएफच्या टिमने वाचवले प्राण

वृत्तसंस्था

**नौगाछिया :** नौगाछिया येथील इस्माईलपूर बिंदटोलीच्या कोसळलेल्या बंधाऱ्याची पाहणी करताना कटिहारचे मुख्य अभियंता पुरात वाहून गेले. कटिहार पूर लढाई विभागाचे मुख्य अभियंता अन्वर जमील सतत तळ ठोकून आहेत. पाडलेल्या बंधाऱ्याची पाहणी करत असताना गंगा नदीच्या जोरदार प्रवाहात तो वाहून गेला. एसडीआरएफच्या टिमने त्याला लगेच वाचवले. मुख्य अभियंता सुरक्षित आहेत. बीरनगर-बुद्धचक गावाजवळ मंगळवारी सकाळी इस्माईलपूर-बिंदटोली बंधारा कोसळला होता. गंगेच्या



पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे बंधारा सुमारे ६० ते ८० मीटरने कमी झाला आहे. या बंधाऱ्याची पाहणी करण्यासाठी मुख्य अभियंता अन्वर जमील बाहेर गेले होते, मात्र बंधाऱ्याजवळ पोहोचत असतानाच मुख्य अभियंता नदीत पडले आणि गंगा नदीच्या जोरदार प्रवाहात वाहू लागली. बंधारा फुटल्याने गंगेचे पाणी आजूबाजूच्या भागात शिरले आहे.

# खासदार कुमारी सेलजा हरियाणा मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत

**नवी दिल्ली :** कॉंग्रेसच्या खासदार कुमारी सेलजा हरियाणा मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत उतरल्या आहेत. त्यांनी शुक्रवारी एका मुलाखतीत त्यांची आकांक्षा उघड केली. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणूक काळात कॉंग्रेसमधील मुख्यमंत्रिपदाची शर्यत तीव्र बनण्याची शक्यता आहे. हरियाणातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. भाजपची सत्ता असणाऱ्या त्या राज्यात १ ऑक्टोबरला मतदान होईल. यावेळी आपल्यासाठी पोषक वातावरण असल्याचा विश्वास कॉंग्रेसला वाटत आहे. त्यातून राज्याचे नेतृत्व करण्यासाठी आतापासूनच पक्षांतर्गत चढाओढ सुरू झाली आहे. अशात प्रामुख्याने राष्ट्रीय राजकारणाचा अनुभव असणाऱ्या सेलजा यांनीही त्या शर्यतीत स्वतःचे नाव नोंदवले आहे.

# १ सप्टेंबरपासून वाहतुकीच्या नियमात मोठा बदल

**विशाखापट्टणम :** वाहतूक नियमांमध्ये आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने आणखी एका नियमाचा समावेश केला आहे. या नवीन नियमानुसार कोणत्याही दुचाकीवर चालणाऱ्या दुचाकीस्वाराला चालकासह हेल्मेट घालणे बंधनकारक करण्यात आले आहे. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा हा नवा नियम या राज्यातील विशाखापट्टणम शहरात १ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

# पावसाची गैरहजेरी; भातशेतीवर रोगांचा प्रादुर्भाव

देशोन्नती वृत्तसंकलन

**डहाणू :** यावर्षी पावसाने लवकर गैरहजेरी लावल्यामुळे भातशेतीवर रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पावसाच्या अभावामुळे आधीच चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना आता भात पिकावर सफेद रंगाचा रोग आणि अळीच्या प्रादुर्भावाने त्रस्त केले आहे. भात रोपांवर सफेद रंगाच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

जुलैअखेरपर्यंत पाऊस सुरू राहिल्याने शेतकरीदेखील सुखावला होता. अनेक शेतकऱ्यांनी लावणीची कामे पूर्ण झाल्यावर पिकाच्या वाढीसाठी खतांचा मारा केला; परंतु, दोन आठवड्यांपासून जिल्ह्याकडे पावसाने पाठ फिरवली आहे. ऐन पावसाच्या हंगामात उन्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले.

### पावसाची ओढ, शेतकऱ्यांच्या जीवाला घोर

शेतांसह नदी, नाल्यांमधील पाण्याची पातळी एकदम कमी झाली आहे. पावसाअभावी शेतजमिनी कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे भातपिकांच्या वाढीला अडथळा निर्माण झाला आहे. पाऊस नसल्याने भातांची रोपेदेखील पिवळी पडू लागली आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या किडरोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. सध्या भातपिकाच्या वाढीचा हंगाम आहे; परंतु, पावसाअभावी रोपांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती आहे.

त्याचबरोबर अळीच्या किड्यांनी भाताच्या पानांवर हल्ला केला आहे. ज्यामुळे पिके नष्ट होण्याची भीती आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकरी कृषी खत आणि औषध खरेदीसाठी खत व औषध सेवा

### शेतकरी हवालदिल



केंद्रांवर लांबच लांब रांगा लावत आहेत; परंतु, योग्य पावसाचा अभाव आणि वाढत्या किडी-रोगांमुळे शेतकरी राजा काहीसा चिंताग्रस्त झाला आहे.

# यश कंन्ट्रक्शनच्या कामात काळाबाजार !

**बोंबला** — भोगस कामे करणाऱ्या यश कंट्रक्शनला अभय?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आडमुठ्या धोरणामुळे व बांधकाम विभागाच्या निष्काळजी पणामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनचालक त्रस्त झाले आहेत.यश कंट्रक्शनला नेमके अभय कोणाचे आहे? असा सवाल स्थानिक नागरिकासह प्रवाशांमधून उपस्थित केला जात आहे. दि.२७ आगष्ट २०२४ मंगळवार रोजी आंदोलन करण्याचा क्रांती नगर येथील नागरिकांनी प्रशासनास लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशीकी,केज शहरातून कानडी माळी सह ग्रामीण भागात जाणाऱ्या रस्त्याचे काम हे सहा महिन्यापासून यश कंट्रक्शन करत आहे. केज –कानडी माळी हा रस्ता कोकीसपिर,क्रांतीनगर ते क्रांतीनगर येथील सार्वजनिक स्मशानभूमी पर्यंत गेल्या सहा महिन्या पासून काम चालू आहे.तसेच नाली बांधकाम काही ठिकाणी पूर्ण झाल्यामुळे एक महिन्यापासून सर्व जुना डांबरी रस्ता खोदून ठेवल्यामुळे व सदर रस्त्याच्या खोदकामामुळे अनेक ठिकाणी केज नगरपंचायतची व धनेगाव ची पाईपलाईन फुटल्या मुळे गेले तीन महिन्या पासून येथील रहिवासी नागरिकांना पिण्याचे पाणी नाही. सध्या पावसाळा चालू आहे दररोज च्या पावसामुळे



सर्व रस्त्यावर चिखल,गाळ झाल्यामुळे दररोज ५० ते ६० मोटर सायकल स्लीप होऊन नागरिक पडत आहेत.यामध्ये महिला,मुली–मुले वयोवृद्ध नागरिक यांचे प्रमाण अधिक आहे.काही ठिकाणी जुने लाईटचे पोल काढून नवे पोल बसविले आहेत तर काही ठिकाणी जुने तसेच आहेत.येत्या तीन दिवसात सदर रस्त्याचे बंद असलेले काम तात्काळ सुरू करण्यात यावे अशी लेखी निवेदनाद्वारे केज तहसीलदार यांच्याकडे मागणी केली आहे. अन्यथा मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०–०० वाजता हनुमान मंदिरा समोर क्रांतीनगर येथील कानडी रोड येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा येथील नागरिकांनी तहसीलदार केज यांना लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना येथील स्थानिक नागरिक म्हणाले की,गेले अनेक दिवसापासून सदर रस्त्याच्या कामाच्या अनुषंगाने यश कंट्रक्शनचे इंजिनिअर व कर्मचारी आणि सार्वजनिक बांधकाम उपविभाग,केज यांना वेळोवेळी तक्रार करून व भेटून देखील आमच्या कामाची कसल्याच प्रकारची दखल घेतली नाही या उलट आम्हाला उडवाउडवीची उत्तरे देत आहेत तसेच काही ठिकाणी नालीचे काम झाले आहे परंतु बऱ्याचशा ठिकाणी नालीला पूर्णपणे तडे गेले आहेत त्यामुळे सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असताना देखील लोक प्रतिनिधी व बांधकाम विभाग डोळेझाकपणा करत आहे असाही नागरिकांनी आरोप केला आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की,सदर रस्त्याचे नालीचे काम अनेक ठिकाणी केले असून काही ठिकाणी गल्लीतील येणाऱ्या पान २ वर...

# रस्त्याची झाली चाळण ;प्रवासी त्रस्त

**सवाल:** सरपंचाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील दैठना ते राजेगाव येथील रस्त्याची दुरवस्था झालेली असुन सार्वजनिक बांधकाम, विद्यमान आमदार,राजेगावा येथील सरपंचाचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते आहे स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांचे गाव म्हणून राजेगावची ओळख आहे परंतु दुर्दैव आहे अशा एवढ्या मोठ्या नेत्यांच्या गावाला सेवा देण्यासाठी शासन, आमदार, सरपंच,बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत आहेत तसेच गावातील भुरटे पुढारी झोपले आहेत का असा प्रश्न नागरिकांना उपस्थित होतो आहे तसेच राजेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव दोन्ही साईडच्या नाल्या बुजल्या आहेत त्यामुळे रोडवर पानी साचल्याने शाळेत जानाऱ्या विद्यार्थ्यांना खुप मोठा त्रास सहन करावा लागत शाळेतील विद्यार्थी लहान असल्याने विद्यार्थ्यांना रोडवर चालता सुध्दा येत नाही मग गावचे सरपंच व भुरटे पुढारी काय गोट्या खेळत आहेत का असा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच विद्यमान पान २ वर...

# मंजूर सोलर पंप चक्क दुसऱ्यालाच समर्पित!

**आष्टीत उपोषण:** अखेर वीज कपनीचे पितळ उघडे पडले

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

अगोदर डीपी मिळवण्यासाठी अर्ज मग त्यानंतर कार्यालयात अनेक हेलपाटे , डीपी ऐवजी सोलर पंप देऊ असा सल्ला आणि एवढे करूनही प्रत्यक्षात वीज महावितरणने मात्र त्याच शेतकऱ्याचा ग्राहक क्रमांक वापरून भलत्यालाच व्यक्तीला सोलार पंप मंजूर करण्याचा पराक्रम महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी केला आहे. मात्र संबंधित शेतकऱ्याने हताश न होता पाठपुरावा केल्यामुळे वीज महावितरण कंपनीचे अखेर पितळ उघडे पडले आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की आष्टी तालुक्यातील बावी येथील शेतकरी अशोक सयाजी गोल्हार यांनी विज महावितरण कंपनीकडे शेतीसाठी एक शेतकरी एक डी पी योजनेतून स्वतंत्र डीपीची मागणी केली होती. त्यासाठी रीतसर पैसेही भरले होते. मात्र तीन वर्षापासून महावितरण कार्यालयात हेलपाटे मारूनही त्यांना डिपी काही मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी बीड येथील अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. तेथील अधिकाऱ्यांनी आता डी पी ऐवजी सोलर पंप देऊ , त्यासाठी तुम्ही बीड येथील मेडा या कार्यालयात जाऊन अर्ज करण्याचा सल्ला दिला. तेथे अर्ज केला असता गोल्हार यांना तुम्ही अर्ज केलेल्या ग्राहक क्रमांकावर आधीच सोलर पंप देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे इतके पान २ वर...

# कष्टाच्या वाटाला संशोधन ग्रंथ पुरस्कार

**अभिनंदनिय:** सलग सातव्यांदा राज्यस्तरीय पुरस्कार

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघ यांच्या वतीने पुरोगामी स्त्रीवादी साहित्य संमेलनात पाठ्यपुस्तकातील कविता' पाणपोईकार' अय्युब पठाण लोहगावकर यांना २०२४ चा राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार 'कष्टाच्या वाटा' या बालकथा संग्रहाला जाहीर झाला आहे. असे पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघाचे अध्यक्ष समाधान दहिवाळ यांनी कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना निवड पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार दिनांक ३१ ऑगस्ट



२०२४ रोजी शनिवारी संध्याकाळी चार वाजता संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथील भानुदास चव्हाण सभागृहात होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पठाण यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात पान २ वर...

# ...तुम्ही निवडणूक लढवावी

**रणधुमाळी:** बहुजन विकास मोर्चा बैठकीत निर्धार

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बहुजन विकास मोर्चा संघटनेकडून येथील एका हॉटेलवर शनिवार दि. २४ रोजी कार्यकर्ता निर्धार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या आयोजित बैठकीत पोटभरे साहेब,तुम्ही येती विधानसभा निवडणूक निर्धाराने लढा!आम्ही तन–मन–धनाने आपल्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहूत.असा निर्धार बैठकीला उपस्थित कार्यकर्त्यांनी बाबुराव पोटभरेंसमोर केला.बैठकीला सभेचे स्वरूप यावेळी आले होते.




युरोप दौरा यशस्वी करून आलेल्या बाबुराव पोटभरे यांच्या स्वागत सत्कारासाठी.व दि.३१ रोजी एसटी एससी यांच्या आरक्षणाचे हक्क सुरक्षित राहावेत.या नियोजनाच्या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्याची बैठक कॉल करण्यात आली होती.या बैठकीला मार्गदर्शन करताना पोटभरे यांनी प्रस्थापित राजकारण्यांवर प्रहार केला. स्वाभिमान आणि आपल्या हक्कासाठी आपण कधीच तडजोड केली नसल्याचे त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितले.केज आणि माजलगाव मतदार संघातून येती विधान सभा निवडणूक लढवणार असल्याचा उल्लेखही यांनी यावेळी केला.यावेळी बाबुराव पोटभरे यांना तुम्ही विधानसभेला उभे रहा.आम्ही तन–मन–धनाने तुमच्या पाठीशी उभे राहून.जीवाचे रान करून पान २ वर...

# बौद्ध महिलेस सरपंच पतीकडून शिवीगाळ!

**कारवाई:** आरोपी विरुद्ध अट्रोसिटीसह गुन्हे दाखल

बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी स्वतः च्या शेतात काम करणाऱ्या बौद्ध महिलेस जातीवाचक शिवीगाळ करीत लाथा बुक्याने मारहाण करणाऱ्या परळी तालुक्यातील इंजेगाव येथील सरपंच पतीसह इतरांविरुद्ध अट्रोसिटी व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील आरोपींना अटक करण्याची मागणी फिर्यादी सखुबाई यशवंत सोनवणे यांनी केले आहे. या घटनेने आंबेडकरी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

परळी तालुक्यातील इंजेगाव येथील बौद्ध महिला सखुबाई यशवंत सोनवणे या त्यांच्या शेतात कष्ट करून आपले व कुटुंबाची दिनचर्या भागवतात . दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सखुबाई सोनवणे या त्यांच्या जाऊ अनुराधा लक्ष्मण सोनवणे यांच्यासोबत शेतात काम करत असताना इंजेगावचे गावचे सरपंच यांचे पती अमोल मारुती कराड व त्यांचे सहकारी शिवहार गोपाळ कराड, श्याम सुखदेव कराड, विकास महादेव कराड यांनी त्यांच्याशी धक्काबुक्की करत मारहाण केली. व जीवे मारण्याची धमकी दिली तसेच चाकूने दंडावर वार केल्याचे सखुबाई सोनवणे यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

सखुबाई यशवंत सोनवणे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी दिनांक २३ ऑगस्ट रोजी आरोपी अमोल मारुती कराड, शिवहार गोपाल कराड ,श्याम सुखदेव कराड व विकास महादेव कराड सर्व राहणार इंजेगाव, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याविरुद्ध कलम ११८ (१) , कलम ११५(२), ३५२, ३५१ ( २), ३५१( ३), ३(५), तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(ी),३(१)(ी),व ३(२)(ीर) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या घटनेतील सर्व आरोपींना अद्यापही अटक झाली नसल्याने त्यांना तात्काळ अटक करावे अशी मागणी सखुबाई सोनवणे यांनी केली आहे. या घटनेने आंबेडकरी समाजात संतापाची लाट उसळली आहे.

# केजमध्ये बदलापूर घटनेचा निषेध!

**आक्रमक :** महाविकास आघाडीचे प्रशासनास निवेदन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथे बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने केज तहसीलदार यांना निवेदन देऊन सदर घटनेचा निषेध नोंदवला आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की,महाराष्ट्र राज्यातील बलात्काराचे वाढते प्रमाण व बदलापूर येथील अत्याचार प्रकरणा तील आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीकरिता महाविकास आघाडीच्या वतीने केज तहसील कार्यालयासमोर सदर घटनेचा निषेध नोंदवून सदर मागणीचे निवेदन केज तहसीलचे प्रभारी तहसीलदार सचिन देशपांडे यांना देण्यात आले.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख अशोक जाधव,शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड,शरदचंद्र पवार



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुरेशतात्या पाटील,तालुकाप्रमुख शंकर जाधव,शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे युवक केज तालुकाध्यक्ष कैलास चाळक,काँग्रेसचे तालुका प्रमुख प्रवीण खोडसे,युवराज मगर, शहरप्रमुख तात्या रोडे,युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले,तालुका संघटक लक्ष्मण गलांडे, उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,युवा सेना विधान सभाप्रमुख,ज्ञानेश्वरबोबडे,उपशाखाप्रमुख पप्पू ढगे,वैजनाथ वाघमारे,सुरज वाघमारे,मारुती पाटील,आप्पा कांबळे,बाबासाहेब देशमुख, तुकाराम घोडके यांच्या सह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंचितच्या राज्य कार्यकारिणीत वर्णी

**अभिनंदनिय :** भोसीकर, बारस्कर, भारतीय यांची निवड

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी अविनाश भोसीकर, रमेश बारस्कर, महेश भारतीय यांची वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या तिघांची महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेदरम्यान लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवलेले अविनाश भोसीकर आणि रमेश बारस्कर यांची उपस्थिती होती, महेश भारतीय यांनी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषविले आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने केलेली निवड आगामी काळात महत्वपूर्ण ठरणार आहे.

**भिक्खू धम्मशील थेरो** — श्रावस्ती बुद्ध विहारात धम्मदेसना

# मनुष्य जीवनास सदगती प्राप्त होते

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी उपासकाचा तिसरा सदगुण हा दान आहे. दानाचे प्रकार तीन असून पहिला प्रकार म्हणजे अमिषदान आहे. जे जे डोळ्यांनी दिसते म्हणजे अन्न,वस्त्र,औषध,निवारा,पैसे,रक्त,कपडे त्यास आमिष दान म्हणतात

दुसरा प्रकार हा अभयदान हा आहे. अभय निराधारांना आधार देणे. भीती मुक्त करणे दुःखी लोकांचे सांत्वन करणे. आसरा देणे होय तर तिसरा गुण म्हणजे,

धम्मदान हा आहे, धम्म म्हणजे नीती असे होय.धम्मदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे. पाच रत्नापेक्षा धम्मदान श्रेष्ठदान आहे. कारण रत्नाची चोरी होते धम्मदानाची चोरी होऊ शकत नाही.त्याच बरोबर

पंचशीलाचे पालन करूनच दान दिले तर ते तेच पुण्य दान होते .दानं दुगती



निवारणं दानामुळे दुर्गतिचे निवारण होते सुगती आणि दुर्गती यामधील फरक म्हणजे, सुगती म्हणजे शांततेत मरण होय,तर दुर्गती म्हणजे तडफडून मरण होय. दान हे सद् गती कडे जाण्याची एक पायरी आहे. स्वर्ग म्हणजे सुगती सुगती म्हणजे शांततेत समाधानाचे मरण होय. औदार्य म्हणजे उदात अंतकरणाने केलेले दान होय. अडीच हजार वर्षापासून बुद्धाचे तत्त्वज्ञान मानवाच्या जीवनाचे कल्याण करत आहे. एवढी ताकद धम्मामध्ये आहे. ४५ वर्षापर्यंत हे दान बुद्धांनी स्वतः मनुष्यांना दिले. दान हे ऊसा समान असून, वरच्या भागात मधल्या भागात व खालचा भागात कुठेही खा ऊस गोडच लागतो. याप्रमाणे आधी, मध्य आणि अंतःही धम्म कल्याणकारीच आहे.असे प्रतिपादन पू. भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार येते रविवारी दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी साप्ताहिक बुद्ध वंदना निमित्ताने धम्मदेशनेत केले.

यावेळी पूजनीय भिक्खू धम्मशील थेरो हे उपासकाचे चार सद्गुण या विषयावर बोलत होते. त्यापैकी आज तिसरा सद् गुण दान या विषयावर सुंदर धम्मदेशना दिली. यावेळी साप्ताहिक पूजेचे यजमान चतुराबाई चिमाजी खळगे, व दत्तात्रय चिमाजी खळगे यांनी भोजनदान दिले.

तसेच दिनेश निसर्गंध यांनी सुंदर भीमगीत सादर केले सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष पान २ वर...


# पात्रुडमध्ये मटका, जुगारचे जाळे

**बोंबला:** अवैध धंद्यांचा बाजार खुलेआम

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या मटका जुगाराने पुन्हा डोके वर काढले आहे. ते आता चक्क रस्त्यावर आले आहेत.

पाथरूड मुख्य रस्त्यावरील हॉटेलमध्ये रस्त्यावर तर रस्त्याच्या कडेला झाडाखाली जुगाराचा खेळ खेळला जात आहे. . अलीकडे हा अवैध धंद्याचा बाजार खुलेआम जोमात असल्याचे चित्र आहे. या अवैध धंद्यांवर पोलिसांनी कारवाई करण्याची आवश्यकता आहे. शहरात अवैध धंद्यांवर पोलिसांनी कारवाई भक्कम केल्यानंतर अनेकजण शहराबाहेर स्थलांतरित होत आहेत. त्यात ग्रामीण भागात ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाढीव भागाचा आसरा अवैध धंदेवाल्यांना पोषक बनत आहे. त्यामुळे वर्षभरापासून माजलगाव ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी अवैद्य धंदे जोमात सुरू आहेत.पातूड गल्लीबोळात छुप्या पद्धतीने वेगवेगळ्या ठिकाणी चालविण्यात येणारे मटका जुगाराचे अड्डे आता खुलेआम चालविले जात आहेत. या मटका



चालविणाऱ्यांना कोणाचेही भय राहिले नाही. तालुक्यात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या मटका जुगाराने पुन्हा डोके वर काढले आहे. मटका जुगाराचा बाजार जोमात असल्याचे चित्र पातूड यथे दिसून येत आहे. कित्येक वेळा माजलगाव ग्रामीण पोलिसांनी काही बुकी चालकांच्या मुसक्या देखील आवळल्या. परंतु त्यानंतर काही दिवसांनी जैसे थे... खुलेआम मटका सुरू असल्याचे पान २ वर...